शुक्रवार दि.२७ सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : २५
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# शिवसेना खुर्द आणि शिवसेना बुद्रुक कोण? मी गोंधळून गेलोय

## छत्रपती संभाजीराजेंची राजकीय परिस्थितीवर मिश्किल टीका

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे बदल झाले आहेत. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे विभाजन होऊन दोन्ही पक्षाचे एक एक गट महायुती सरकारमध्ये आहेत तर दोन गट महाविकास आघाडीमध्ये आहेत. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असे चित्र होते, मात्र आता यात तिसरी आघाडी देखील तयार झाली आहे. छत्रपती संभाजीराजे यांचा स्वराज्य पक्ष आणि आमदार बच्चू कडू यांचा प्रहार जनशक्ती पक्ष तिसरी आघाडी बनवण्याच्या तयारीत आहेत. यासंदर्भात मुंबईत बैठकही पार पडली आहे. यानंतर संभाजीराजे छत्रपती यांनी राजकीय परिस्थितीवर भाष्य केले आहे.

छत्रपती संभाजीराजे म्हणाले, दोन काँग्रेस, दोन राष्ट्रवादी पक्ष यामुळे मी गोंधळून गेलो आहे. गाव दोन नावांचे असतात, तसे कोण आहेत? राष्ट्रवादी खुर्द, कोण आहेत ? राष्ट्रवादी बुद्रुक कोण आहे? शिवसेना खुर्द आणि शिवसेना बुद्रुक कोण? हे का जनतेच्या हितासाठी झाले का? तुम्ही आमच्या आयुष्याचा खेळ केला, अशी मिश्किल टीका संभाजीराजे यांनी केली आहे.



पुढे बोलताना संभाजीराजे म्हणाले, माझे चॅलेंज आहे यांना, तुम्ही किल्ल्यांसाठी किती पैसे दिले हे सांगा. ७५ वर्षात १ कोटी खर्च. फक्त शिवाजी महाराजांचे नाव घ्यायचे. राजकोट किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा पुतळा बसवला तेव्हा मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले होते. १२ डिसेंबर रोजीच मी सांगितले होते की पुतळ्याचे काम योग्य पद्धतीने झाले नाही. मात्र तेव्हा कोणी बोलले नाही, विरोधकही शांत होते.

संभाजीराजे म्हणाले, शर्यतीतील शेवटचे घोडे पुढे आले तर त्याला डार्क हॉर्स असे नाव दिले जाते. तसे आपण डार्क हॉर्स आहोत. आपण टुकटुकचा घोडा असून कसे मागून पुढे जाणार हे कळणार पण नाही. आम्ही का फक्त आयुष्यभर चळवळ करायची? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

यावेळी बच्चू कडू यांचे कौतुक करताना संभाजीराजे म्हणाले, बच्चू कडू यांच्याकडून शिकण्यासारखे आहे की, वेळप्रसंगी कुठली महायुती? आता थोकठोकी होणार, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला आहे.

बच्चू कडू आणि माझी मुंबईत बैठक झाली. तेव्हा आपण नावीन्यपूर्ण महाराष्ट्र घडवण्याचा प्रयत्न करू, अशी आमची चर्चा झाली. ही चर्चा सुरू असताना शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी एकत्र आलो आहोत, असे या चर्चेत निष्पन्न झाले. वेगळा महाराष्ट्र आपण घडवू शकतो आणि त्यानुसार आम्ही प्रयत्न करणार असल्याचे संभाजीराजे छत्रपती यांनी यावेळी सांगितले.

---

### आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या

# निकृष्ट कामाच्या चौकशीसाठी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामात सन २०२२ मध्ये पूरहानी दुरुस्ती,एफ.डी.आर., ए.एम.सी.पशुवैद्यकीय दवाखाना,वांजरा फाटा ते कुसलंब रस्ता कामातील अनियमितता व निकृष्ट कामाबाबत गेल्या ६ महिन्यापासून पाठपुरावा करूनही सदर निकृष्ट कामाची विभागीय गुणनियंत्रक पथकामार्फत तपासणी न झाल्यामुळे निकृष्ट कामाच्या चौकशीसाठी उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे जनहितार्थ याचिका दाखल करण्यात आली असल्याची माहिती याचिकाकर्त्याचे ड. नरसिंह जाधव यांनी दिली.

आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यात सन २०२२ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत झालेल्या पूरहानी दुरुस्ती, एफ.डी.आर.,ए.एम.सी. कामामध्ये सुमारे ५ कोटी रुपयांची कामे करण्यात आलेली आहेत.परंतु हि कामे नेमकी कोणत्या





ठिकाणी केली गेली व या कामामध्ये कंत्राटदार कोण व या कामाबाबतची निविदा कोणत्या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली.याची माहिती नसल्याने जिल्ह्यासाठी नेमका किती निधी आला होता.याची माहिती जनतेला नाही तसेच पशुवैद्यकीय दवाखानाच्या नवीन इमारती साठी २ कोटी ५० लाख रुपया पैकी ८० ते ९० टक्के रक्कम अदा करूनही अद्यापपर्यंत हे काम पूर्ण झालेले नाही तसेच वांजरा फाटा ते कुसलंब रस्ताही अपूर्ण स्थितीत आहे. व वरील कामे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले असल्यामुळे कैलास दरेकर जिल्हाध्यक्ष शेतकरी सेना मनसे बीड यांनी संबंधित विभागाला निवेदन देऊन ही सदरील कामाची विभागीय गुणनियंत्रक पथकामार्फत तपासणी करावी अशी मागणी केली.परंतु वेळोवेळी निविदने देऊनही अद्याप पर्यंत हि तपासणी न झाल्यामुळे व दोषीवर कारवाई न झाल्यामुळे कैलास दरेकर जिल्हाध्यक्ष शेतकरी सेना मनसे बीड यांनी मा.उच्च नायायालय खंडपीठ औरंगाबाद येथे जनहितार्थ याचिका स्टॅम्प क्र. २५०८३/२०२४ ड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्या मार्फत दाखल करण्यात आली आहे.

---

# गावंडे महाविद्यालयात ‘राष्ट्रीय सेवा योजना दिन’ संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

येथील गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयात ‘राष्ट्रीय सेवा योजना दिन’ साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. व्ही. एस. इंगळे होते व प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा.अभय जोशी उपस्थित होते.

२४ सप्टेंबर हा ‘राष्ट्रीय सेवा योजना दिन’ म्हणून देशात सर्वत्र साजरा केला जातो. राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणते, म्हणून विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला पाहिजे, सेवा आणि श्रमाचा संस्कार राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये होतो, असे प्रतिपादन प्रा. अभय जोशी यांनी केले. तर अध्यक्षपदावरून बोलताना प्रा. डॉ. व्ही. एस. इंगळे यांनी जीवनात संस्कारांचे खूप महत्त्व असून राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विद्यार्थ्यांवर संस्कार होतात,

असे सांगून विविध उदाहरणे देऊन उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी काही विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.



वरिष्ठ महाविद्यालयातील मागील दोन वर्षांतील उत्कृष्ट स्वयंसेवक विद्यार्थी अमित अरुण केंद्रेकर, कांचन गजानन जाधव, वैभव वाघ, योगेश बुरकुले, निकेश वानोळे व रितेश माने यांना पारितोषिक व प्रमाणपत्रे देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ईश्वरी झांबरे या विद्यार्थिनीने स्वागतगीत सादर केले.

प्रास्ताविक प्रा.साधना देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन रोहिणी कदम हिने केले तर आभार आकाश जळके या विद्यार्थ्याने मानले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव बा. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रो. डॉ. प्रशांत अनासाने, प्रा. एस. एस. इंगळे, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. नितीन ठाकरे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

---

# सरस्वती इंग्लिश स्कूल व विद्यालयाचा विद्यार्थी गजानन कोरडे आर्मी जीडी सिलेक्शन झाल्याबद्दल अध्यक्षच्या वतीने सत्कार

### तुमच्या जीवनामध्ये यश संपादन करायचे तर जिद्द चिकाटी ठेवा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन–राजेंद्रजी देशमुख

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील नामांकित शाळा सरस्वती इंग्लिश स्कूल व सरस्वती विद्यालय या विद्यालयाचा विद्यार्थी गजानन विठ्ठल कोरडे हिसोडा आर्मी जीडी सिलेक्शन झाल्याबद्दल शाळा व अध्यक्ष च्या वतीने विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार करण्यात आला दरवर्षी या शाळेचा निकाल व या शाळेचे विद्यार्थी वेगवेगळ्या फीड मध्ये जाऊन यश संपादन करतात यांना घडवणारे शिक्षक विद्यार्थ्यांचा कसून सराव करतात विद्यार्थ्यांचे ध्येय त्यांचा उद्देश या उद्देशानुसार या शाळेतील शिक्षक



विद्यार्थ्यांचा कसून सराव करतात व त्यांच्या ध्येयापर्यंत पोहोचवतात, व तसाच या शाळेचा विद्यार्थी गजानन विठ्ठल कोरडे यांची आर्मी जीडी सिलेक्शन झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना शाळेचे अध्यक्ष राजेंद्रजी देशमुख, प्र. अधिकारी ए .के बावस्कर सर, एम.डी. लोखंडे सर, सेमी इंग्लिश मध्यम प्रिन्सिपल, डी.टी .खंडाळकर सर, गोरे सर, उपमुख्याध्यापक मनोज सर, पत्रकार गणेश सपकाळ, आदींची उपस्थित होते.

**आमच्या शाळेतील संपूर्ण स्टॉफ एकजुटीने व प्रामाणिकपणे काम करतो विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता व त्यांचं ध्येयाप्रमाणे आमचे शिक्षक विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करतात म्हणून दरवर्षी आमच्या शाळेचा निकाल उत्कृष्ट असतो स्कॉलरशिप, नवोदय, एमबीबीएस, मेडिकल, आर्मी, इंजीनियरिंग, अशा वेगवेगळ्या फीड साठी दरवर्षी आमच्या शाळेतून अनेक विद्यार्थ्यांची निवड होते.**



---

### अजित पवार यांच्या कडून नाहटा यांच्या वर मोठी जबाबदारी

# धुळे जिल्हा निरिक्षक पदी बाळासाहेब नाहटा यांची नियुक्ती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा बाजार सामतीचे माजी सभापती आणि अहमदनगर दक्षिण जिल्ह्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब नाहाटा यांच्यावर पक्षाने आणखी एक महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली.नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य पणन मार्केटिंग फेडरेशनच्या निवडणुकीत बाळासाहेब नाहटा यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जास्तीत जास्त संचालक निवडून आणण्याचा करिष्मा दाखवला. त्यांच्या या यशस्वी नेतृत्वामुळे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष श्री. सुनील तटकरे यांनी त्यांची धुळे जिल्ह्याच्या




निरीक्षकपदी जाहीर नियुक्ती केली आहे.

या नियुक्तीबद्दल सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक कार्यकर्त्यांनी बाळासाहेब नाहाटा यांचे हार्दिक अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली धुळे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा संघटनात्मक विस्तार होऊन व बळकटी येईल असा विश्वास कार्यकर्त्यांनी यावेळी व्यक्त केला.

---

**झाडे लावा झाडे जगवा**



## चारोळी

अपेक्षाचं ओझं
डोईवर कशास हवं?
शोधीत जाऊ वाट वेगळी
गवसेल थोडं तरी नवं.

रंजना सानप
मायणी (सातारा)

---

# शनिवार दि.२८ सप्टेंबर रोजी श्रीगोंदा विविध कार्यकारी सेवा सह. सोसायटीची १०७ वी वार्षिक सर्वसाधरण सभेचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा : श्रीगोंदा विविध कार्यकारी सेवा सह. सोसायटीची सन २०२३-२०२४ ची १०७ वी वार्षिक सर्वसाधरण सभा शनिवार दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी संस्थेचे चेअरमन पोपट कोथिंबीरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी संस्थेच्या सर्व सभासदांना उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे चेअरमन पोपट कोथिंबीरे, व्हा. चेअरमन मंदाकिनी वडवकर, सचिव राजेंद्र सिदनकर, संचालक बापूराव सिदनकर, मोहनराव डांगरे, भीमराव आनंदकर, सुनिल बोरुडे, अशोक आळेकर, सखाराम औटी, राजू गोरे, सुभाष बोरुडे, अनिल ननवरे, हनुमंत उदमले, ज्योती खेतमाळीस, भाऊसाहेब मखरे यांनी केले आहे.

---

# अमरावतीमध्ये होणार बैठक,नेत्यांची यादी जाहीर होण्याची शक्यता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे मिशन विदर्भ सुरू झाले आहे. येत्या २७ आणि २८ सप्टेंबर रोजी राज ठाकरे अमरावतीच्या दौऱ्यावर असणार आहेत. यावेळी विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येणार आहे. २७ तारखेला अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांचा तर २८ तारखेला नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांचा आढावा राज ठाकरे घेणार आहेत.मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यापूर्वी ७ उमेदवार जाहीर केले आहेत. आता विधानसभा निवडणुकीसाठी विदर्भातून पहिली यादी राज ठाकरे जाहीर करू शकतात. २७ तारखेला सकाळी ७.३० वाजता राज ठाकरे अमरावती रेल्वे स्थानकावर पोहोचणार आहेत. त्यानंतर त्वरितच विदर्भातील नेत्यांची यादी जाहीर केली जाणार असल्याचे बोलले जात आहे.दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील महायुतीला पाठिंबा दिला होता. त्यावेळी देखील त्यांनी महायुतीच्या उमेदवारांसाठी सभा घेतल्या होत्या. मात्र आता राज ठाकरे विधानसभा निवडणूक स्वबळावर लढणार असल्याचे दिसत आहे.

लोकनेता न्यूज नेटवर्क

बुधवारची सकाळ सुरू झाली ती पावसानेच. आम्हाला देवगिरी पकडायची होती नांदेड स्टेशनवरून. सर्वांना सकाळी आठ वाजता प्लॅटफॉर्म नंबर चार वर या म्हणून निरोप दिला होता. पावसातच सोन्या मारुती मंदिर व स्वामी समर्थ मंदिराचे दर्शन घेऊन अंदमान टूर यशस्वी करण्यासाठी साकडे घातले. आठ वाजून दहा मिनिटांनी स्टेशनवर पोहोचलो तर संदीप मैंद यांनी सर्वांना सूचना केली की, आज देवगिरी प्लॅटफॉर्म नंबर चार ऐवजी तीन ला येत आहे. आधीच पूर्व सूचना मिळाल्यामुळे सर्व लावाजमा प्लॅटफॉर्म नंबर तीन कडे रवाना झाला. आलेल्या सर्व टुरिस्टचे संदीप मैंद, जयश्री ठाकूर, विशाल मुळे, राजेशसिंह ठाकूर यांनी मोत्याची माळ घालून स्वागत केले. देवगिरी यायची वेळ झाली तरी डिस्प्ले वर कोच पोझिशन लावली नसल्यामुळे स्टेशन मास्तरकडे फोनवरून तक्रार नोंदवली. अवघ्या एका मिनिटात डिस्प्लेवर कोच पोझिशन दाखवल्यामुळे सर्वजण आपापल्या बोगीसमोर पोहोचलो.

नऊच्या सुमारास देवगिरी ने नांदेड स्टेशनवर प्रवेश केला. आमच्या सर्वांची एसीची तिकिटे कन्फर्म असल्यामुळे निश्चिंत होतो. बी वन ते बी फोर तसेच काहीजण ए वन कोच मध्ये बसले. आमच्या बी टू कोच चा एका साईडचा दरवाजा आतून बंद होता. त्यामुळे सामान ठेवायला अडचण येत होती. बी वन मधून जाऊन पाहिले तर काय दरवाजा च्या मागे बेडरोल चे गठ्ठे टाकलेले होते. कोच अटेंडंट ला रागावलो. टी सी कडे आणि रेल्वे कंप्लेंन नंबर १३९ वर तक्रार दाखल केली. सहप्रवाशांनी एवढ्याशा




# अंदमान च्या बेटा वरून



लेखक * धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर

**अमरनाथ यात्री संघाचे अध्यक्ष धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांच्या सिद्धहस्त लेखन शैलीतून रोमांचकारी असणारा अंदमान टूर चा रोज चा वृत्तांत याच ठिकाणी दररोज प्रसिद्ध करण्यात येणार आहे. कृपया वाचकांनी प्रतिसाद द्यावा ही विनंती. – संपादक**

गोष्टीसाठी तक्रार का करता असे विचारले. मी त्यांना म्हटले की, आपण गुपचूप बसलो तर सुधारणा होणार नाही. आपल्याला त्रास झाला तो इतरांना होऊ नये यासाठी हे करणे गरजेचे आहे. रेल्वेने तक्रारीची तात्काळ दखल घेतली. अर्ध्या तासाच्या आत सर्व बेडरोल दरवाजापासून हटवून दरवाजा मोकळा केल्याचे अटेंडंट ने येऊन सांगितले.

(भाग २)

नांदेड ते सिकंदराबाद हा आमचा रेल्वे प्रवास सुरू झाला. सर्वांना माय हॉलिडेजच्या टीमने मिनरल वॉटर वाटले. दुपारचे जेवण प्रत्येकाने घरून आणलेले होते. महिलांनी एकमेकांना आपले खाद्य पदार्थ दिल्यामुळे मस्तपैकी अंगत पंगत झाली. जेवणानंतर पुरुषांनी वामकुक्षी घेतली तर महिलांनी गाण्याच्या भेंड्या खेळल्या. काहीनी गप्पांचा फड जमविला. राजकारण, क्रिकेट, चित्रपट या विविध विषयावर मनसोक्त चर्चा झाली प्रत्येकाने आपापली मते व्यक्त केली.तीनच्या सुमारास सिकंदराबाद स्टेशन वरील प्लॅटफॉर्म नंबर ७ वर सर्वजण उतरलो. जयंत वाणी या टूर मॅनेजर ने सर्वांचे स्वागत केले.आमच्या बसेस प्लॅटफॉर्म नंबर दहाच्या बाहेरील रस्त्यावर उभ्या होत्या. सर्वांनी लाल रंगाची कॅप परिधान केलेली असल्यामुळे स्टेशन बाहेर पडायला कोणतीही अडचण आली नाही. दोन बस मधून आम्ही सर्वजण हॉटेल कडे निघालो. रस्त्यात चहा कॉफी साठी सर्वजण एका ठिकाणी थांबलो. दर्जेदार पेय घेतल्यानंतर आमची पुढे वाटचाल सुरू झाली. शमशाबाद भागातील विमानतळा जवळ असलेल्या सिडाडेल या फोर स्टार हॉटेलमध्ये सर्वांची निवासाची व्यवस्था करण्यात आली होती.प्रत्येक जोडप्यासाठी स्वतंत्र रूमची व्यवस्था केलेली होती.भव्य हॉटेल व प्रशस्त रूम पाहून सर्वजण खुश झाले.

आमच्या इतर सर्व यात्रांमध्ये फक्त शाकाहारी भोजन देण्यात येते. पण ही काही धार्मिक यात्रा नसल्यामुळे व्हेज आणि नॉनव्हेज ची प्रत्येक ठिकाणी सोय केलेली होती. रात्रीचे जेवण अतिशय स्वादिष्ट होते. जेवणानंतर मिळालेला मालपोवा व आईस्क्रीम चा आस्वाद सर्वांनी घेतला. सकाळी सहा चे विमान पकडायचे असल्यामुळे गैरसोय होऊ नये यासाठी रात्री दोन वाजता उठणे भाग होते. त्यामुळे सर्वांना रूम मध्ये जाऊन आराम करण्याच्या सूचना दिल्या. संदीप सोबत हॉटेल मध्ये फेरफटका मारला. तळमजल्यावर असलेल्या भव्य हॉलमध्ये बरीच लगबग दिसून येत होती. सहज चौकशी केली असता उद्या होणाऱ्या एका वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी दीड कोटीचे डेकोरेशन लावण्यात येत होते. याशिवाय प्रति व्यक्ती जेवणासाठी दोन हजार रुपये प्लेटचा दर होता. मनात विचार आला की, एका रात्रीत जितके पैसे खर्च करण्यात येत आहे तेवढ्या पैशात तर भाऊचा डबा दहा वर्ष सहज चालला असता.

हॉटेल मधील रूम आणि जेवण अप्रतिम असल्यामुळे फर्स्ट इम्प्रेशन चांगले पडले होते. अंदमानच्या बेटावरून या सदराचा पहिला भाग प्रसिद्ध झाल्यामुळे अनेकांनी फोन करून पुढचा तुमचा अंदमानचा टूर कधी आहे याची चौकशी केली.संदीपजी बरोबर चर्चा केल्यानंतर जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात पुढील अंदमानचा टूर काढण्याचे निश्चित केले. ज्यांनी चौकशी केली होती त्यांना निरोप दिल्यानंतर सहा जणांनी बुकिंग करण्यासाठी पैसे पाठवितो असे सांगितले. पंधरा दिवसात सर्व डिटेल्स काढून अधिकृत अंदमान टूरची घोषणा केल्यानंतरच आडवांस पाठवा असा त्यांना निरोप दिला. प्रशस्त रूममध्ये पडल्या पडल्या झोप कधी लागली हे कळाले देखील नाही.

# अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयात एक दिवसीय एल.ई.डी.बल्ब निर्मिती कार्यशाळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**



पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर येथे भौतिकशास्त्र विभागामार्फत डी. बी. टी. स्टार योजने अंतर्गत एक दिवसीय ‘एल. ई. डी. बल्ब निर्मिती कार्यशाळा’ पार पडली. कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी १०.०० वाजता प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे अध्यक्षतेत झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. शिवाजी भुजबळ यांनी केले. डी.बी.टी. स्टार कॉलेज योजना समन्वयक व महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर. एन. शिरसाट यांनी डी. बी. टी. स्टार योजनेविषयी थोडक्यात माहिती दिली.महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के. डी. सोनावणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. हरिभाऊ बोराटे यांनी कार्यशाळेच्या व्याख्यात्या सौ. सोनाली राऊत व डॉ. अविनाश रोकडे यांचा परिचय करून दिला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांनी ऊर्जा हे व्यवसायातील खूप मोठे क्षेत्र असून यात भरपूर प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. जग तीव्र ऊर्जा संकटाकडे वाटचाल करत असताना, पर्यायी ऊर्जा संसाधने आणि ऊर्जा कार्यक्षम उपकरणांची बदलत्या काळानुसार सतत गरज भासत आहे, असे मत यावेळी प्राचार्यांनी व्यक्त केले.कार्यशाळेत अवियन्स सायंटिफिक, पुणेच्या फाउंडर, सौ. सोनाली राऊत यांना ’विजेच्या बल्बचा इतिहास व कार्य’ याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व प्रयोगशाळेमध्ये एल. ई. डी. बल्ब बनविण्याचे प्रात्यक्षिके देऊन विद्यार्थ्यांकडून बल्ब बनवून घेतले. तसेच डॉ. अविनाश रोकडे यांनी एल. ई. डी. बनविण्याची पद्धत, पी.सि.बी., ड्राइवर डिझाईन, सोल्डरिंग, कंपोनंन्ट फिटिंग, टेस्टिंग व रिपेरिंग, या मूलभूत संकल्पनांची माहिती दिली.कार्यशाळेच्या समारोपाच्या वेळी डी.बी.टी. स्टार कॉलेज योजना समन्वयक, डॉ. आर. एन. शिरसाट यांनी भविष्यात पुन्हा अशा कार्यशाळा विभागामार्फत आयोजित करण्यात याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यशाळेस ६० हुन अधिक विद्यार्थी सहभागी झाले असून तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी प्रत्येकी एक असे एकूण यशस्वीरित्या ६० एल.ई.डी. बल्ब तयार केले. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा खूपच उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून काही विद्यार्थ्यांनी भविष्यात स्वतःचे एल.ई.डी. बल्बचे स्टार्टअप सुरु करण्याचा विचार मांडला.सदर एकदिवशीय कार्यशाळा यशस्वी पार पाडण्यासाठी भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. शिवाजी भुजबळ, डॉ. हरिभाऊ बोराटे, डॉ. एस. के. कोळेकर, प्रा. स्नेहल डुंबरे, प्रा. स्वप्नाली साबळे, विद्या अढारी, जयसिंग डुंबरे व नवनाथ पारधी यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. एस. एस. लंगडे, प्राध्यापक डॉ. राहुल पाटील, डॉ. पवन हांडे, प्रा. महेश गंभीर, प्रा. परदेशी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हरिभाऊ बोराटे यांनी केले. तसेच, डॉ. एस. के. कोळेकर यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. सदर कार्यशाळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.

# रासपचे नेते राजेभाऊ फड यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात जाहीर प्रवेश

## बीड जिल्ह्यातील सर्वच्या सर्व आमदार निवडून आणणार;खा.बजरंगबप्पा सोनवणे यांचा निर्धार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

राष्ट्रीय समाज पक्षाचे माजी युवा प्रदेशाध्यक्ष, परळी तालुक्यातील सक्रिय कार्यकर्ते राजेभाऊ फड यांनी आज शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. राष्ट्रवादीतील फुटीनंतर परळीचे आमदार असलेल्या धनंजय मुंडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना साथ दिली. त्यामुळे या मतदारसंघात शरद पवार हे नवीन चेहऱ्याच्या शोधात असून इतर पक्षातील नेत्यांना आपल्याकडे खेचण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या पार्श्वभूमीवर आज राजेभाऊ फड यांना पक्षात घेत पवार यांनी धनंजय मुंडे यांच्याविरोधात मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केल्याचं बोललं जात आहे.

मुंबईत आज शरद पवार यांच्यासह राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षा फौजिया खान, खासदार सुप्रिया सुळे, आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार रोहित पवार, बीड जिल्ह्यातील खासदार बजरंग सोनवणे, बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत राजेभाऊ फड यांनी आपले सहकारी श्री सोपानराव तोंडे युवा नेते सौ. मंगलताई श्रीकृष्ण सोळंके ( जिल्हा सरचिटणीस भाजपा ) श्री प्रमोद किरवले ( माजी जिल्हा परिषद सदस्य बीड ) डॉ जान मोहम्मद शेख (जिल्हा संघटक शिवसेना शिंदे गट बीड ) विक्रम रमेश देशमुख ( उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते ) अश्विनी नागोराव सोळंके ( माजी सरपंच नागापूर परळी ) कुसुमताई शिंदे ( माजी सरपंच जयगाव ) सतीश कुंडगीर ( माजी सरपंच कौडगाव घोडा परळी ) यांच्यासह हाती तुतारी घेतली.

राष्ट्रीय समाज पक्षाच्या युवा प्रदेशाध्यक्षपदी राहिलेले राजेभाऊ फड हे कन्हेरवाडी गावचे सरपंच आहेत. तसंच त्यांनी परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचं संचालकपदही भूषवलेलं आहे. परळी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीतर्फे निवडणूक लढवण्यास ते इच्छुक आहेत. त्यांना शरद पवारांकडून तिकीट दिलं जाणार का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# बीड शहरात बचाव मंचने प्रश्न हाती घेतला की लगेच नगरपालिकेने घेतली दखल

## जेसीपी च्या साह्याने क्रांती कॉलनी, मित्र नगर भागातील कचऱ्याचे ढीग उचलण्यास सुरुवात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड शहरात अनेक नागरी समस्या आहेत या समस्या बीड बचाओ मंच स्थापन करून अगोदर समजून घेतल्यानंतर अत्यंत महत्त्वाच्या व आवश्यक अशा प्रश्नावर सातत्याने आवाज उठवणाऱ्या प्रयत्नामुळे नगरपालिका प्रशासन आता हळूहळू कुठेतरी काम करताना दिसत आहे. पावसाळ्याचे दिवस आहेत. अनेक सकल भागामध्ये पाणी जमा होते, रस्त्यात खड्डे पडले आहेत. या सर्व गोष्टींकडे आता सुजान नागरिक लक्ष घालून प्रश्न सोडण्यासाठी बीड शहर बचाव मंचच्या सर्व टीमला संपर्क करत आहेत. व काही प्रमाणात का होईना त्या समस्या सोडवायला सुरुवात झाली आहे त्यामुळेच हे काम होऊ शकले त्यामुळे नागरिकांनी आभार देखील मानले आहे. त्याचे झाले असे की बीड शहर बचाव मंच अंतर्गत सदस्य डॉ. अशोक मसलेकर व नितीन जायभाये यांच्या संयुक्त प्रयत्नातून दिनांक २६ सप्टेंबर २०२४ रोजी क्रांती कॉलनी, मित्र नगर येथील चार प्लॉट मधील घनकचरा साफ करून कचऱ्याचे ढीग जेसीबीच्या साह्याने उचलायला केली सुरुवात. बीड शहर बचाव च्या सर्व पदाधिकारी टीमचे व येथील रहिवाशांनी डॉ.अशोक मसलेकर व नितीन जायभाये यांचे आभार व्यक्त करून नगरपालिकेबद्दलही कृतज्ञता व्यक्त केली.



# सतत शेतकरी अडचणीत एक तर मदत द्या नाहीतर आमच्या वर गोळ्या झाडा आता आम्हाला दुसरा पर्याय नाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

गेल्या तीन दिवसापासून सिंदखेड राजा आणि किनगाव राजा महसूल मंडळामध्ये अतिवृष्टी झाली असून अद्याप शेतकऱ्यांना कुठल्याही शासनाकडून मदतीचा आश्वासन मिळाले नाही म्हणून आम्हाला एक तर मदत द्या नाहीतर आमच्यावर गोळ्या झाडा याच्याशिवाय आमच्याकडे दुसरा पर्याय नाही म्हणून आज शेतकरी मित्र सिंदखेड राजा आणि शेतकरी योद्धा कृषी समिती बुलढाणा जिल्हा यांच्या वतीने दिनांक २६ सप्टेंबर रोजी माननीय तहसीलदार साहेब यांना निवेदन देऊन या मंडळामध्ये दिनांक २३/९/२०२४ ते २५/९/२०२४ या तीन दिवसात सिंदखेडराजा मंडळामध्ये व किनगाव राजा मंडळामध्ये सतत तीन दिवस अतिवृष्टी झालेली आहे सदर अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची अतोनात नुकसान झालेले आहे सोयाबीनचे नुकसान १००% झाल्याचे दिसत असून कपाशीचे सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे या नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल झाला असून त्याला या नुकसान भरपाई मिळण्याची गरज आहे योग्य ती कारवाई करून सर्व शेतकऱ्यांचे पंचनामे करण्याचे आदेश देऊन झालेले नुकसान भरपाई शेतकऱ्याला कशी मिळेल यासाठी आपण स्वतः तात्काळ पाठपुरावा करावा अशी विनंती श्री शेतकरी मित्र दिलीप भाऊ चौधरी व शेतकरी योद्धा कृती समितीचे समन्वयक श्री बालाजी सोसे यांनी केली असून या परिसरामध्ये दिनांक २४ सप्टेंबर रोजी ३१.५ मिली व दिनांक २५ सप्टेंबर ६७.५ मिली दिनांक २६ सप्टेंबर ३८.८ मिली या हा रेनफॉल रिपोर्टनुसार अहवाल असून किनगाव राजा महसूल मंडळ येथील पर्जन्यमापक यंत्रणा पूर्णपणे बंद असून संबंधित तालुका कृषी अधिकारी यांनी त्या यंत्रणेचा पंचनामा केला आणि त्याच पंचनामांमध्ये असा उल्लेख करण्यात आला आहे की संबंधित सिंदखेडराजा येथील रेन फॉल रिपोर्ट हे किनगाव राजा मंडळाला लागू करण्यात येईल असे आश्वासन दिले होते आणि सिंदखेडराजा महसूल मंडळाचाच नियम लावून किनगाव राजा मंडळाला मदत मिळावी व त्यामुळे आपण संबंधित कर्मचाऱ्यांना पंचनामा करण्याचे आदेश काढण्यात यावे जर आपण या अतिवृष्टीची माहिती शासनापर्यंत पोहचवली नाही किंवा संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पंचनामे करण्याचे आदेश दिले नाही तर या सिंदखेडराजा मंडळातील व किनगाव राजा मंडळातील शेतकरी ताबडतोब येत्या तीन दिवसांमध्ये सर्व शेतकरी धरणे आंदोलन करणार आहे, तरी आपण योग्य ती काळजी घेऊन या अतिवृष्टी पावसा संदर्भात शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेऊन पुढील कारवाई करण्यात यावी करिता आपणास निवेदन देऊन सरकारचे लक्ष वेधले यावेळी शेतकरी मित्र दिलीप भाऊ चौधरी शेतकरी योद्धा कृती समितीचे समन्वयक श्री बालाजी सोसे व शेतकरी गोविंदराव टेके, जनार्दन मुंडे , विशाल मुंडे, उद्धव मुंडे, नरसिंग सोसे ,दत्तात्रय झोरे, दत्तात्रय बोडके ,देवानंद सोसे, गणेश मुंडे ,जगदीश मुंडे, संदीप राऊत, आसन शेख अणि या ठिकाणी असंख्य शेतकरी उपस्थित होते.





# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाची राज्यस्तरीय कार्यशाळा व चर्चासत्र श्री क्षेत्र शेगाव येथे मोठ्या उत्साहात संपन्न

## पत्रकाराच्या अन्यायाला वाचा फोडणारी एकमेव संघटना;राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

रविवार दिनांक २२ सप्टेंबर रोजी अन्नपूर्णा व्हेज प्लाझा,जगदंबा माता चौक शेगाव,जिल्हा बुलढाणा येथे संघाची कार्यशाळा व चर्चासत्र खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान हे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक राज्य उपाध्यक्ष विष्णू कंकाळ यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी कसा होईल याची पुरेपूर काळजी घेतली होती.तसेच उपस्थित सर्व मान्यवरांना आदल्या दिवशी राहण्यापासून ते कार्यक्रम संपजेपर्यंत व्यवस्थितरीत्या त्यांची सोय करण्यात आली. कार्यक्रमाला आलेले सर्वच पदाधिकारी व प्रतिनिधींनी विष्णू कंकाळ यांच्या कामाचे तोंड भरून कौतुक केले, तसेच बुलढाणा जिल्हा अध्यक्ष विश्वास कंकाळ यांनी देखील कार्यक्रमासाठी खूप परिश्रम घेतले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी म्हणाले की आयोजक राज्य उपाध्यक्ष विष्णू कंकाळ यांनी जो अथक परिश्रमाने कार्यक्रम यशस्वी केला याबद्दल सर्वांनी टाळ्या वाजून यांना धन्यवाद द्यावे,तसेच सर्व पदाधिकारी स्वखर्चाने उपस्थित झाल्यामुळे तुमच्यासाठी सुद्धा एकदा जोरदार टाळ्यांचा जयघोष करा.कार्यक्रमाच्या सुरुवातीला बागलाण तालुक्यातील पदाधिकारी व पत्रकार हिरालाल बाविस्कर यांचं नुकताच निधन झाल्याने त्यांना पुरोगामी पत्रकार संघाच्यावतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळेस पुढे बोलताना संस्थापक अध्यक्ष म्हणाले की पुरोगामी पत्रकार संघाचा प्रत्येक पदाधिकारी हा आर्थिक दृष्ट्या सक्षम पाहिजे आणि तो कसा होईल यासाठी पुरोगामी पत्रकार संघ प्रयत्न करणार आहे, यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात संघाच्या वतीने विविध उपक्रम सुरू करून त्या जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांना आर्थिक स्रोत निर्माण करायचे आहेत, तसेच पुढे म्हणाले की मला संघातील प्रत्येक पदाधिकारी गाव विकास समितीच्या माध्यमातून सरपंच ते आमदार आणि खासदार पर्यंतचा प्रवास करताना बघायचे आहे, मी स्वतः कधीही राजकारण करणार नाही,किंवा मोठ्या पदावरही कार्यरत असणार नाही, परंतु मला पदाधिकाऱ्यांना मोठं होताना पाहायचे आहे,आणि ते मी नक्कीच करणार अशी ग्वाही यावेळी बोलताना दिली.संघ व पदाधिकारी व प्रतिनिधीसाठी मला जे काही शक्य होईल ते मी करण्याचा प्रयत्न करत आहे व करीत राहीन.

तसेच यावेळेस बीड जिल्हा अध्यक्ष दत्तात्रेय मुजमुले यांनी सभा विशेष गाजवली त्यांच्या सडेतोड विचाराच्या भाषणाने सर्वांचे मन जिंकले,त्यांनी बोलताना संघ का वाढत नाही, याचे महत्त्वाचे कारण म्हणजे राज्यस्तरीय वरिष्ठांचा संवाद. जिल्हाध्यक्ष ते तालुकाध्यक्षा पर्यंत पोहोचत नसल्याने संघ वाढत नाही,अशी खंत व्यक्त केली.

उपस्थित प्रत्येक पदाधिकारी तसेच संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी यांनी त्यांच्या सडेतोड भाषणाचं तोंड भरून कौतुक केले.तसेच यावेळी संघाच्या वतीने एक महत्त्वाचा मुद्दा मांडण्यात आला,तो म्हणजे बळीराजा हक्क समितीच्या माध्यमातून वधु वर परिचय मेळावा घेण्यात येणार असल्याचे.संस्थापक अध्यक्ष यांनी जाहीर केले की यामध्ये विशेष प्राधान्य शेतकरी बांधवांना देण्यात येणार आहे,ज्या शेतकऱ्यांच्या मुलांचे लग्न होत नाही, अशा सर्व तरुण बांधवांचा विचार यावेळेस पुरोगामी पत्रकार संघाने केलेला आहे. संघ अनाथ आश्रम मधील मुली दत्तक घेऊन या तरुणांचे विवाह वधू वर परिचयाच्या माध्यमातून लग्न लावून देणार आहेत.या अभुतपुर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाशिक जिल्हाध्यक्ष रफिक सय्यद यांनी केले कार्यक्रमाला खालीलपैकी उपस्थिती होती.

राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी,राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब आडांगळे,राज्य अध्यक्ष संतोष जाधव,राज्य कार्याध्यक्ष विष्णू कंकाळ राज्य सचिव निलेश ठाकरे,राज्य उपाध्यक्ष ज्ञानेश्वर बागुल, अन्याय अत्याचार निवारण समितीच्या राज्य अध्यक्षा कल्याणी धोंगडे,कार्याध्यक्षा प्रमिला अडांगळे,उपाध्यक्षा दीपा अग्रवाल,उपाध्यक्ष दत्ता पाटील,राज्य सचिव प्रीतमसिंग चौहान,पुरोगामी पत्रकार संघाचे मराठवाडा विभाग अध्यक्ष शंकर सिंग ठाकूर,नांदेड जिल्हा अध्यक्ष मारोती शिकारे,राज्य संपर्कप्रमुख रफिक सय्यद, कार्याध्यक्षा मनीषा पवार,प्रदीप देवरे,शेखर सोनवणे,निळकंठ जाधव,बाळासाहेब आसवले, विकलांग समितीचे राज्य अध्यक्ष सुखदेव खुर्दळ,पुरोगामी पत्रकार संघाचे रायगड जिल्हाध्यक्ष धनाजी पुदाले,रायगड जिल्हा सचिव राजपाल शेगोकार, रायगड जिल्हा सह सचिव दत्तू ठोके,वैशालीताई हिंगोले मराठवाडा अध्यक्षा महिला, तुळशीराम पाटील लुंगारे मराठवाडा उपाध्यक्ष,सोपान जाधव मराठवाडा संघटक,राजू सिंह ठाकुरनांदेड जिल्हा उपाध्यक्ष,मारोती कांबळे लोहा तालुका अध्यक्ष,अंगद पाटील गवते लोहा तालुका उपाध्यक्ष, जेष्ठ पत्रकार विनोद महाबळे, अन्याय्य अत्याचार निवारण समिती सदस्या सीमा चव्हाण, युवा प्रतिनिधी प्रसन्न चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

---

## लढणाऱ्या माणसाला कस जपलं पहिजे

# हे सिंदखेडराजा मतदारसंघातील नागरीकांनी दाखवून दिलं-तुपकर

### सिंदखेडराजा विधानसभेतही शेतकरी-कष्टकऱ्यांचा उमेदवार उतरवू



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेडराजा । ज्ञानेश्वर बुधवत**

रविकांतभाऊ तुपकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातल्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक काल (ता.२५ सप्टेंबर २०२४) सिंदखेडराजा येथे पार पडली. लोकसभा निवडणुकीत सिंदखेडराजा मतदारसंघातील नागरिकांनी आपल्याला भरभरून प्रेम दिलं. या मतदारसंघात आपल्याला जवळपास ७५००० हजार मतं मिळाली. लढणाऱ्या माणसाला कसं जपलं पाहिजे, आपल्यासाठी लढणाऱ्या माणसाची कशी साथ दिली पाहिजे, हे येथील मतदारांनी दाखवून दिलं. जन सामान्यांच प्रेम मी कधीही विसरू शकत नाही. येणाऱ्या निवडणुकीतही शेतकरी-कष्टकऱ्यांची ही एकजूट आपल्याला कायम ठेवायची आहे. येणारी विधानसभा निवडणुक ही आपल्याला ताकदीने लढायची आहे. उमेदवार कोण असेल या संदर्भात आपल्या सर्वांशी चर्चा करून लवकरच निर्णय घेण्यात येईल, पण आता कामाला लागा, असे आवाहन रविकांतभाऊ तुपकरांनी यावेळी केले.

---

# सोयाबीनला ८५०० भाव व सरसकट कर्ज माफीसाठी चालु असलेल्या औसा येथील आमरण उपोषणास जाहीर पाठिंबा




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकाला केंद्र सरकारने ४८९२/- रु हमीभाव जाहीर केला आहे. तो. शेतकऱ्यांना परवडणारा नाही. सोयाबीनला ८५००/- रु हमीभाव घावा तरच शेतकऱ्यांना परवडणारा आहे. कारण उत्पन्नापेक्षा सोयीबीन पेरणी व काढणी खर्च जास्त आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना राज्य सरकारने ८५००/- रुपये भाव देण्यात यावा व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करावी यासाठी औसा जि. लातूर येथे शेतकरी नेते अ.भा. छावा प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील यांचे चालू असलेल्या आमरण उपोषणास आम्ही जाहीर पाठींबा देत आहोत. यावर तात्काळ ही मागणी मान्य करावी अन्यथा तहसील कार्यालयासमोर तिव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी असे निवेदन छावा संघटनेच्या वतीने देण्यात आले यावेळी तालुका अध्यक्ष प्रताप पाटील सोठाणकर ,छावाचे संपर्क प्रमुख साई पाटील मोरे,रावसाहेब साई पाटील मोकासदरेकर,विनायक पाटील माहेगावकर,माधव पाटील शिंदे,बालाजी देशमुख,बालाजी पाटील कल्याण,भगवान पाटील राहेरकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते

---

# आ.संजय रामुलकर यांच्या प्रयत्नातून लोणार शहरातील चार कोटींची विकास कामे मंजूर

लोकनेता न्यूज नेटवर्क **लोणार । विनायक कुटे**

आमदार संजय रायमुलकर यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे शासनाच्या नगर विकास विभागाने लोणार शहराच्या विविध भागातील चार कोटी रुपयांची विविध विकास कामे तारीख २५ सप्टेंबर रोजी मंजूर केली आहेत.



केंद्रीय आयुष, आरोग्य ,कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव (स्वतंत्र प्रभार) यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार रायमुलकर यांच्या प्रयत्नातून लोणार शहरातील विविध चार कोटींची विकास कामे मंजूर झाली आहेत. नगरविकास विभागाच्या वतीने ता. २५ सप्टेंबर रोजी उपसचिव श्रीकांत आडंगे यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध झालेल्या परिपत्रकान्वये सदर मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. गवळीपुरा भागातील नगर परिषदेच्या खुल्या जागेवर मुस्लिम समाजासाठी शादी खाना बांधकाम ५० लाख रुपये, नगरपालिकेच्या विविध शाळांचे बांधकामासाठी एक कोटी वीस लाख रुपये, त्याचप्रमाणे महावीरनगर मधील मेन रोड ते बचाटे, दहातोंडे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे बांधकाम व नाली बांधकाम एक कोटी १५ लाख रुपये ,खटकेश्वर नगर मधील विजय सानप यांच्या घरापासून लोणी रस्त्यापर्यंत रस्त्याचे व नालीचे बांधकाम ३० लाख रुपये, लिंबी बारव ते निकस सर यांचे घर रस्ता व नाली बांधकाम ५० लाख रुपये , राहुल मापारी यांच्या घरासमोरील रस्त्याचे व नालीचे बांधकाम ३५ लाख रुपये. विकास कामांच्या मंजुरीबद्दल आमदार संजय रामुलकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. नगर विकास विभागाकडून वरीलप्रमाणे लोणार शहरासाठी चार कोटी रुपयांची विकास कामे मंजूर करण्यात आल्याची माहिती आमदार रायमुलकर यांचे स्वीय सहाय्यक रुपेश गणात्रा यांनी दिली आहे.

---

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांचा स्वप्नपूर्ती सोहळा आणि लाभार्थी मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न

## दौंड मधील ६०० पेक्षा अधिक लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न साकार झाल्याचा आनंद-आ.राहुल कुल




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी ) तील लाभार्थ्यांचा ' स्वप्नपूर्ती सोहळा व लाभार्थी मेळावा' पिंपळगाव येथे मोठ्या उत्साहात पार पडला.पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या दौंड तालुक्यातील ५१ महसुली गावातील नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजना (शहरी ) चा लाभ मिळावा यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला,प्रकल्प अहवाल मंजुरी,योजनेच्या अंमलबजावणीतील विविध त्रुटी,अडचणी सोडवण्यासाठी,लाभार्थी अनुदान मिळावे यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना वेळोवेळी सूचना केल्या, आज सुमारे ६०० हुन अधिक नागरिकांच्या हक्काच्या घरांचे स्वपन साकार होतानाच आनंद अवर्णीय आहे.

आजतागायत दौंड तालुक्यातील एकूण २५४६ लाभार्थ्यांची प्रकरणे मंजूर झाली व त्यातील पात्र लाभार्थांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत , डिसेंबर २०२४ पर्यंत उर्वरित सर्व पात्र लाभार्थ्यांना योजेनचा लाभ मिळवून देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे.केंद्र शासनाने नुकतीच प्रधानमंत्री आवास योजना २ ला मंजुरी दिली असून या पुढील काळात अनुदानाची रक्कम देखील वाढण्याची शक्यता आहे तेव्हा नवीन प्रकल्प अहवाल तातडीने मंजूर व्हावेत यासाठी आपण प्रयत्नशील आहोत,अधिकाधिक नागरिकांनी याचा लाभ घ्यावा यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी ) तील अडथळे दूर करून गोरगरिबांना हक्काचे घर मिळवून दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार,पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे आयुक्त योगेश म्हसे यांचे आमदार राहुल कुल यांनी आभार मानले.

यावेळी भाजपा प्रदेश उपाध्यक्षा कांचन कुल, भीमा पाटसचे उपाध्यक्ष नामदेव बारवकर,भाजपा तालुकाध्यक्ष हरिभाऊ ठोंबरे,बाजार समितीचे सभापती गणेश जगदाळे,पंचायत समितीच्या माजी सभापती उषाताई चव्हाण,जेष्ठ नेते माऊली ताकवणे,गोरख दिवेकर,भाजपचे युवा मोर्चा तालुकाध्यक्ष बापू भागवत,किसान मोर्चा अध्यक्ष अरुण आटोळे,पिंपळगावच्या सरपंच सुप्रियाताई नातु यांच्यासह लाभार्थी,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी येथे स्वच्छता हीच सेवा अंतर्गत रासेयो दिनानिमित्त

## महाविद्यालयीन स्वच्छता ही सेवा मोहीम




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी देऊळगाव राजा च्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना दिवस उत्साहाने साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रफुल्ल ताठे यांच्या हस्ते रा.से.यो. चे आराध्य दैवत संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी डॉ. प्रफुल्ल ताठे यांनी उपस्थित स्वयंसेवकांना एक रासेयो स्वयंसेवक कसा असावा , त्याचे कर्तव्य व जबाबदाऱ्या,यासोबतच राष्ट्रीय सेवा योजनेच्या च्या माध्यमातून एक स्वयं सेवक आपला देश सेवेचा वसा कसा चालवू शकतो यावर सखोल मार्गदर्शन केले. यांनतर स्वच्छता ही सेवा या अंतर्गत महाविद्यालयीन स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये स्वयंसेवकांनी परिसरातील कचरा संकलन करून त्याची विल्हेवाट लावली. या प्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. गोपाल सीताफळे, रासेयो कार्यक्रम अधिकारी श्री योगेश जाधव, प्रा. शितल रघुवंशी व रासेयो स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित महाविद्यालयातील परिसरातील स्वच्छता करून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले . या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. गोपाळकृष्ण सिताफळे व प्रा.किशोर चराटे प्रा. पुरुषोत्तम लड्डा प्रा. गणेश पिंपळे राष्ट्रीय सेवा योजना संयोजक यांच्यावतीने करण्यात आले.

# शेतकरी,शेतमजुरांचा बैलगाडी सहतहसील कार्यालयावर आक्रोश मोर्चा धडकला

## सिंदखेडराजा येथील आमदाराला थंड हवेच्या ठिकाणी मतदार पाठवणार–दिलीप वाघ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत

निवडनुक आली मतदारसंघात येतात व निवडणूक संपली की साडेचार वर्षे थंड हवेच्या ठिकाणी बुलढाणा येथे जाऊन बसणाऱ्या आमदाराला मतदारसंघातील मतदार यावेळी थंड हवेच्या ठिकाणी बुलढाणा येथे बसविणार असलयाचा घनाघती आरोप डॉ राजेंद्र शिंगणे यांचे नाव न घेता उबाठा दिलीप वाघ यांनी आज सिंदखेडराजा येथील आक्रोश मोर्चात तहसील कार्यालयात बोलताना केले आहे

उबाठा शिवसेनेच्या वतीने आज झोपलेल्या सरकारला जागे करण्यासाठी आज सकाळी ११ वाजता राष्ट्रमाता जिजाऊंच्या जन्मस्थळी अभिवादन करून या मोर्चाला सुरुवात मोठ्या प्रमाणात बैलगाडी सह ट्रकटर, हजारो नागरिकांच्या उपस्थितीत तहसील कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला यावेळी दिलीप वाघ पुढे बोलताना म्हटले की या मतदारसंघातील आमदारांनी ३० वर्ष या मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले आहे मात्र निवडणूकीपुर्ते हे आमदार मतदार संघात राहतात व साडेचार वर्षे थंड हवेच्या ठिकाणी बुलढाणा येथे राहतात या मतदार संघात खडकपूर्णा प्रकल्प दोन साखर कारखाना, गिरणी असून ही त्यांनी मतदार संघाचा विकास न करता हे सर्वाची विक्री यांनी केली आहे भाजप सरकार हे विक्री सरकार असलयाची टिका दिलीप वाघ यांनी केली आहे उध्दव ठाकरे सरकारने निवडून आल्यानंतर मागील अडीच वर्षात शेतकऱ्यांचे दोन लाखांपर्यंत कर्ज माफ केले आहे या भाजप सरकारने असे निकष लावले की सिंदखेडराजा यामध्ये बसत नाही भाजप हे विक्री सरकार आहे



आता शेतकरी मतदार या सरकारला त्यांची जागा दाखवणयाची वेळ आली आहे मोर्चात सरकार विरोधात सोयाबीन कापूसाचे हमी भाव देण्याची मागणी करण्यात आली तर या आक्रोश मोर्चाचे तहसील कार्यालयात जाहीर सभेत रूपांतर झाले यावेळी जिल्हा प्रमुख जालीदर बुधवतउपजिल्हा प्रमुख बद्री बोडखे ,सहसंपर्क प्रमुख छगन दादा मेहेत्रे, महीला आघाडीचे, संजिवनी वाघ यांची सरकार विरोधात भाषणे झाली,२५ सप्टेंबर रोजी हजारोंच्या संख्येने शेतकरी या मोर्चात सहभागी झाले होते

शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, पिक विम्याचे पैसे, घरकुलाचे अनुदान यासह विविध मागण्यांना घेऊन उबाठा शिवसेनेचा आक्रोश मोर्चा आज सिंदखेड राजा तहसील कार्यालयावर धडकला आहे. सरकारच्या उरात धडकी भरवण्यासाठी या मोर्चाला हजारोंच्या संख्येने शेतकरी उपस्थित होते कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सिद्धू आंधळे यांनी केले तर या आक्रोश मोर्चात शिवसेना नेते जिल्हा संपर्कप्रमुख नरेंद्र खेडेकर, जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवंत, सह– संपर्कप्रमुख छगन मेहत्रे, आशिष रहाटे, उपजिल्हाप्रमुख बद्री बोडखे, तालुकाप्रमुख महेंद्र पाटील या सभेनंतर शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार मनोज सातव यांच्यामार्फत राज्यपालांना देण्यात आले आहे.

# ३० सप्टेंबर रोजी माहात्मा गांधी विद्यालय आष्टी येथे आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा

**❝ विश्वरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन कार्य,मानव जातीवरील कोविड–१९ संकट,महामानव छत्रपती शिवाजी महाराज,मोबाईल वापर योग्य की अयोग्य,शेतकरी राजा उभ्या जगाचा पोशिंदा,ग्रामीण भागातील मुली यांपैकी एका विषयावर भाषण स्पर्धा होणार..!–मराठा सेवा संघाचे अध्यक्ष इंजि.तानाजी बापू जंजिरे**




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

शालेय विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व कलेस वाव मिळावा म्हणून मराठा सेवा संघ या सामाजिक संस्थेच्या वतीने आष्टी येथे आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.या स्पर्धा सोमवार दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी महात्मा गांधी विद्यालय,सोनवणे हॉस्पिटल जवळ आष्टी येथे सकाळी १०:०० वाजता सुरू होतील.स्पर्धेसाठी २००१, १५०१, १००१ ,५०१ असे आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

आष्टी पासून २५ किलोमीटरच्या परिघामध्ये असलेल्या माध्यमिक शाळा या स्पर्धेत भाग घेऊ शकतील. प्रत्येक शाळेने आठवी नववी किंवा दहावी या वर्गात शिक्षण घेत असलेल्या फक्त दोन स्पर्धकांना स्पर्धेसाठी पाठवायचे आहे.या स्पर्धेतील भाषणासाठी पुढील विषय ठेवण्यात आले आहेत विश्वरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांचे जीवन कार्य,मानव जातीवरील कोविड–१९ संकट,महामानव छत्रपती शिवाजी महाराज,मोबाईल वापर योग्य की अयोग्य,शेतकरी राजा उभ्या जगाचा पोशिंदा,ग्रामीण भागातील मुली गुणवत्तेमध्ये मुलांपेक्षा सरस ठरत आहेत. प्रत्येक स्पर्धकाने वरीलपैकी एका विषयावर भाषण करायचे आहे.

स्पर्धेचे सविस्तर नियम व अटी यासाठी ड सीताराम पोकळे पत्रकार ,'संपर्क९४ २१ ६३ ८० ५५',संयोजक अंतर शालेय वक्तृत्व स्पर्धा आष्टी केंद्र यांच्याशी संपर्क साधावा.किंवा महात्मा गांधी विद्यालय आष्टी चे मुख्याध्यापक जावेद पठाण सर यांच्याशी संपर्क करावा असे मराठा सेवा संघाचे अध्यक्ष इंजि. तानाजी बापू जंजिरे यांनी कळवले आहे.

# रमाबाई आवास योजनेतून घरकुलाचा हप्ता मिळेना,लाभार्थी करणार बोंबाबोंब आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

रमाबाई घरकुल आवास योजनेअंतर्गत तालुक्यात अनेक घरकुले प्राप्त झाले मात्र अद्यापही अनेक लाभार्थी घरकुलाच्या पहिल्या हप्ता च्या प्रतीक्षेत आहेत वारंवार पंचायत समितीच्या घरकुल विभागांमध्ये चक्रा मारून मारून नागरिकांचे हाल होत असल्याचे पहावयास मिळाले आहे तर या अगोदरही रमाबाई घरकुल आवास योजने चा लाभार्थ्यांना पहिला हप्त्याची मागणी करण्यात आली होती परंतु काहीच नागरिकांना पहिला हप्ता मिळाला आज दिनांक २६ सप्टेंबर रोजी च्या दुपारी एक वाजता संतप्त लाभार्थी यांनी पंचायत समितीचे बिडिओ यांना निवेदन देऊन निवेदनावर योग्य ती कारवाई करावी व घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता तात्काळ देण्यात यावा अन्यथा दिनांक ३० सप्टेंबर वार सोमवारी रोजी सकाळी ठीक अकरा वाजता पंचायत समिती कार्यालयाच्या समोर बोंबाबोंब आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदन करते यांच्या वतीने देण्यात आला आहे तर पंचायत



समितीच्या घरकुल विभागाचे कर्मचारी हे निधी उपलब्ध नाही असे स्पष्ट उत्तर देत आहेत या निवेदनावर नागसेन ठोके, अमरदीप ठोके, स्वप्निल खिल्लारे , भगवान ठोके, अनिल कांबळे,आतुल ठोके , विलास कांबळे,शुभम मोरे, विलास ठोके, भगवान ठोके, विकास ठोके,उत्तम ठोके, कैलास कांबळे, रवि ठोके,बुध्दराज ठोके,आनंदा मैदकर,मानिक ठोके, दिपक ठोके, लिंबाजी कांबळे, प्रकाश ठोके ,कडुजी ठोके ,झनक ठोके, मिलिंद ठोके यांच्या सह इतरांच्याही स्वाक्षऱ्या आहेत तर घरकुल लाभार्थ्यांचे घरकुलाचा हप्ता कधी पडणार याकडे लक्ष लागले आहे,

# सुभाष गायकवाड यांचे दु:खद निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले



कै.सुभाष नारायण गायकवाड यांचे बुधवार दि.१८/०९/२०२४ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचे पश्चात गं.भा. विमल सुभाष गायकवाड (पत्नी) श्री. विष्णु बापू गायकवाड (चुलता) श्री. संतोष विष्णु गायकवाड (भाऊ) श्री. अक्षय नवनाथ गायकवाड (पुतण्या) श्री. नवनाथ नारायण गायकवाड (भाऊ) सौ. गयाबाई दादासाहेब फटाकडे (बहिन) चि. अभय नवनाथ गायकवाड (पुतण्या) समस्त गायकवाड असा परिवार आहे त्यांचा दशक्रिया विधी दि.२७/०९/२०२४ रोजी सकाळी ०७:३० वा. सिद्धेश्वर मंदिर आढळगाव ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. येथे होणार आहे.


# आसरा माता दुर्गा उत्सव मंडळ अध्यक्षपदी प्रशांत मोकासरे, उपाध्यक्षपदी लोखंडे,तर सचिवपदी गोपाल लहाने यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पारध । रमेश जाधव

आसरा माता दुर्गा नवरात्रौत्सव २०२४ कमिटीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष पदी प्रशांत मोकासरे यांची तर उपाध्यक्षपदी गणेश लोखंडे, तर सचिव पदी गोपाल लहाने यांची निवड करण्यात आली

आसरा माता दुर्गा उत्सव मंडळ आयोजित नवरात्रोत्सानिमित्त ३ ते १२ ऑक्टोंबर या नऊ दिवसात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान या कार्यक्रमासाठी उत्सव कमिटीच्या कार्यकारणी मध्ये सचिव पदी गोपाल लहाने तर कोषाध्यक्ष सचिन गवळी यांची, सल्लागार उमेश लोखंडे, गजानन जाधव, सुरेश महाराज देशमुख, शिवा पाटील लोखंडे, जगदीश लोखंडे,दत्ता लोखंडे, तुषार राऊत , अजय श्रीवास्तव, रवी तबडे,दीपक देशमुख, गजानन लोखंडे, परमेश्वर लोखंडे, काशिनाथ लोखंडे, आकाश लोखंडे, निलेश लोखंडे, गौरव देशमुख, आदित्य देशमुख,विशाल लोखंडे, अक्षय श्रीवास्तव, अमित ठाकूर, गौरव मोकशे, राहुल देशमुख,अमोल देशमुख,सांस्कृतिक विभागासाठी विवेक प्रहाड,विठ्ठल राऊत, सागर बोराडे,अविनाश गिरी, पवन तेलंग्रे ,रामेश्वर लोखंडे, कैलास लोखंडे,व्यवस्थापन कमिटी मध्ये योगेश भारती,सागर देशमुख, समाधान तेलंग्रे, मयूर लोखंडे,दर्शन लोखंडे, रोहन लोखंडे,राजू लोखंडे, विजय लोखंडे, गोपाल लोखंडे ,सागर लोखंडे, संदिप लोखंडे,यांची आणि दुर्गामाता पुजन कमिटी मध्ये गोकुळ लोखंडे,संदीप गवळी, अक्षय बोराडे,अक्षय देशमुख, विशाल तेलंग्रे,कृष्णा मोकासरे, बाबासाहेब लोखंडे, विनोद तेलंग्रे, विठ्ठल देशमुख, गोपाल तबडे, विशाल देशमुख, मंगेश देशमुख,शुभम लोखंडे , गोपाल इखनकर , शंकर सपकाळ , वैभव लोखंडे यांची निवड करण्यात आली आहे.



# शिवछत्र मित्र मंडळाच्या माध्यमातुन १२ वर्षीय मुलीच्या किडनी प्रत्यारोपनाचे काम मार्गी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार सरोवर । विनायक कुटे

लोणार –शिवछत्र मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांच्या संकल्पनेतून जनता दरबाराचे आयोजण करण्यात आले.दि. २६ सप्टेंबर रोजी लोणार तालुक्यातील शिवनी जाट येथील १२ वर्षीय कु. प्राची किशोर खंदारे हिच्या दोन्ही किडन्या अचानक निकामी झाल्याने मदतीसाठी नंदकिशोर मापारी यांच्याकडे आले असता. शस्त्रक्रिया करिता साडे चार लाख रुपये मदत केंद्रीय मंत्री प्रतापरावजी जाधव यांच्या माध्यमातुन वैधीकीय मदत



कक्ष मार्फत मिळून देण्याचे तातडीने कार्य केले.

मोल मजुरी करून जीवन जगणाऱ्या १२ वर्षीय कु. प्राची चे ६० वर्षीय आजोबा ब्रम्हा केशव खंदारे हे आपल्या नातीला एक किडनी देणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएन हॉस्पिटल मध्ये तिच्यावर उपचार करून किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. वैध्यकीय कक्षाचे प्रमुख राजू भोर यांनी दै. देशोन्नतीशी बोलताना सांगितले कि साडेतीन लाख रुपये शस्त्रक्रिया व १ लाख रुपये मदत औषधी साठी देण्यात येणार आहे. शिवनी जाटचे सरपंच चंद्रकांत बरले यांच्या माध्यमातून शिवछत्र मित्र मंडळाच्या जनता दरबरात सदर मुलीला आण्यात आले होते.गरीब परिस्थिती असल्याने शस्त्रक्रिया साठी अजूनही पैसे लागू शकतात यासाठी माणुसकीच्या नात्याने मदतीचा हात म्हणून मुलीचे वडील यांचे बँक खाते क्र.३४७३९३२२३३६ यावर किंवा फोन पे नंबर ७७९८०६९४६६ वर आर्थिक मदत करण्याचे आव्हान शिवछत्र मित्र मंडळाच्या माध्यमातून नंदकिशोर मापारी यांनी केले आहे.

# परतीचा पाऊस पुन्हा झोडपणार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

मान्सून परतीच्या प्रवासाला असताना महाराष्ट्राला पावसाने चांगलेच झोडपले आहे. मुंबई आणि पुणे परिसरामध्ये झालेल्या जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. मुंबईत आणि उपनगरात आजही मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता मुंबई, पालघर, ठाणे, पुणे जिल्ह्यातील शाळांना तसेच महाविद्यालयांना शासनाच्या वतीने सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना या जिल्ह्यांना देखील आज जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904